# प्रेसनोट

दि. ३०/०३/२०२४

## सावित्रीबाई फुले विद्यापिठ, पुणे कडून मार्गदर्शक म्हणून नेमलेल्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | डॉक्टर शकुंतला निवृत्ती माने, वय ५९ वर्ष, पद - प्राध्यापक (वर्ग-१), अर्थशास्त्र विभाग, बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे. (पीएचडी मार्गदर्शक - सावित्रीबाई फुले विद्यापिठाकडून मान्यताप्राप्त) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २५,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | त्यापैकी पहिला हप्ता २०,०००/- रुपये (वीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | २६/०३/२०२४ |
| सापळा दिनांक | ३०/०३/२०२४ |

ठिकाण :- बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुखाचे कार्यालय, सांगवी, पुणे.

थोडक्यात माहिती :-

यातील तक्रारदार हे प्राध्यापक असून, त्यांनी अर्थशास्त्र मध्ये **Ph. D.** डिग्री प्राप्त करुन घेण्यासाठी ऑनलाईन प्रबंध सावित्रीबाई फुले विद्यापिठ, पुणे करीता तयार केलेला आहे. सदरचा प्रबंध सावित्रीबाई फुले विद्यापिठाकडे सादर करण्यासाठी तक्रारदार यांचे मार्गदर्शक म्हणून लोकसेविका शकुंतला माने यांची सावित्रीबाई फुले विद्यापिठाकडून नियुक्ती झालेली आहे. तक्रारदार यांनी सादर केलेला प्रबंध रिजेक्ट करण्यासाठी व सुधारणा करुन पुन्हा सादर करणे व त्यावर अप्रुव्हल देणे यासाठी लोकसेविका शकुंतला माने यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेविका शकुंतला माने यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष वरील कामकाजसाठी २५,०००/- रुपयाची लाच रक्कमेची मागणी केली व आज दि. ३०/०३/२०२४ रोजी लोकसेविका शकुंतला माने यानी तक्रारदार यांचेकडून त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन रुपये २०,०००/- (वीस हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक सुदाम पाचोरकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner